# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-६७ दिनांकः- १९/०३/२०२१

## ब्ल्यु मुन हॉटेलमध्ये हुक्का पार्लरवर नवघर पोलीस ठाणेकडून कारवाई

दिनांक १७/०३/२०२१ रोजी २३.०० वा. सुमारास नवघर पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई यांना गोपनीय बातमीदाराकंडून माहिती मिळाली की, नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये ब्ल्यु मुन हॉटेल येथे एक इसम अनधिकृत हुक्का पार्लर चालवत आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई यांनी पोलीस पथक तयार करुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे नवघर पोलीस ठाणेचे पोलीस पथकाने छापा टाकुन खात्री केली असता ब्ल्यु मुन हॉटेलमध्ये शासनाने बंदी घातलेल्या तबांखुजन्य हुक्का विक्री केला जात असल्याचे व काही ग्राहक तो विकत घेवून ओढत असताना मिळुन आले. अनधिकृत हुक्का पार्लर चालवत असलेला इसम नामे अमीत मिश्रा, त्याचा स्टाफ, व तंबाखुजन्य हुक्का विकत घेवून तो ओढणारे इसम अशा एकुण ३४ व्यक्तींनां ताब्यात घेवून त्यांचेवर नवघर पोलीस ठाणेस गु र नं २०२/२०२१ भादवि सं कलम १८८,२६९,२७०,२७२,२८५,३३६,३४ सह सिगारेट आणि तंबाखुजन्य उत्पादने व्यापार, वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनियमन अधिनियम २००३ चे कलम ४,२१ सह साथरोग अधिनियम १९८७ चे कलम ३,४ प्रमाणे गुन्हा नोदं करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री अमित काळे, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-०१, श्री शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग, वपोनि/श्री संजय देसाई, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), नवघर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री गणेश केकाण, सहा. पोलीस निरीक्षक श्री भास्कर पुल्ली, सपोनि/योगेश काळे, पोउपनिरी/भगवान पाटील, पोशि/संजय चव्हाण, पोशि/आकाश वाकडे, पोशि/जितेंद्र निवळे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पूढील तपास सपोनि/गणेश केकाण हे करीत आहेत.